दै. प्रजावाणी दि. 25.01.25

संमिश्र

• नांदेड, शनिवार, दि. २५ जानेवारी २०२५

**भांडण जीवावर बेतले • सीसीटीव्ही कॅमेऱ्यात तिघांना टिपले; छत्रपती संभाजीनगरातून आरोपींना उचलले**

# आनंदनगरः विद्यार्थी खूनप्रकरणी ५ आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

प्रतिनिधी • नांदेड

आनंदनगर भागात झालेल्या विद्यार्थ्याच्या खून प्रकरणानंतर सीसीटीव्ही कॅमेराने टिपलेल्या तीन व अन्य दोन आरोपींना पोलिसांनी शुक्रवारी पकडले आहे. खून करून हे आरोपी छत्रपती संभाजीनगर येथे लपून बसले होते, अशी माहिती पोलिसांनी दिली. हे सर्व आरोपी अल्पवयीन आहेत.

शहरातील आनंदनगर भागात साईनाथ कुळेकर या सतरा वर्षीय विद्यार्थ्याचा खून केल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली होती. भर वर्दळीच्या आणि गर्दीच्या ठिकाणी झालेल्या खुनाच्या घटनेनंतर शहरात एकच खळबळ उडाली होती.

दरम्यान, हा प्रकार सीसीटीव्ही कॅमेराने कैद केला असला तरी, घटनेतील आरोपी फरार झाले होते. या खून प्रकरणात नेमके आरोपी किती आहेत आणि खून करण्यामागचे कारण कोणते आहे हे स्पष्ट होत नसल्याने वेगवेगळे अंदाज लावण्यात येत होते. या घटनेची शहरात वारेमाप चर्चा झाली असली तरी, अल्पवयीन असलेले आरोपी पोलिसांना सापडत नव्हते. दोन दिवसांपासून पोलिसही वणवण भटकत होते. त्यांना पकडण्यासाठी दोन पोलीस पथकांची निर्मिती करण्यात आली होती. अखेर या खून प्रकरणातील संशयित आरोपी हे छत्रपती संभाजीनगर येथे लपून बसल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाल्यानंतर तेथून त्यांना ताब्यात घेतले.

आरोपी हे विधीसंघर्षित बालक असल्याने त्यांची रवानगी सुधारगृहात पाठविण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अति. पो. अधीक्षक सुरज गुरव, अति.पो.अ. खंडेराय धरणे, डीवायएसपी किरतीका सी.एम., डीवायएसपी सुशिल कुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली विमानतळ ठाण्याचे पो. नि. गणेश चव्हाण, सपोनि जोंधळे, पोउपनि विनोद साने, डी.बी.तील दारासिंघ राठोड, शेख जावेद, शे. शोएब, राजेश माने, रितेश कुलथे, नागनाथ स्वामी, हरप्रितसिंघ सुखई, दिगंबर डोईफोडे आदींनी केली.



संवेदनहीन जमाव

चाकूचा वार केल्यानंतर जखमी झालेला साईनाथ घटनास्थळावर बराच वेळ विव्हळत होता. अति रक्तस्राव झाल्याने मृत्यूने त्याला ओढले. दरम्यान, त्याच वेळी रक्तस्राव होत असलेल्या जखमेवर एखादे कापड गुंडाळले असते आणि जवळील हॉस्पिटलमध्ये नेले असते तर कदाचित त्याचे प्राण वाचू शकले असते. परंतु, चाकू हल्ल्याच्या घटनेनंतर जमलेल्या जमावातून एकही मदतीसाठी धावून आला नाही. अनेकांनी काढता पाय घेतला तर काहींनी दूर राहून पाहण्यातच धन्यता मानल्याची चर्चा आनंदनगर भागात केली जात आहे.

## खुनाचे कारण काय?

खुनाचे कारण मात्र जुना वाद असल्याचे सांगितले जाते. मयत साईनाथच्या लहान भावासोबत आरोपींचा काही महिन्यापूर्वी वाद झाला होता. त्या वेळी साईनाथने मध्यस्थी केली होती. त्यानंतर साईनाथला एकटे पाहून खून केल्याची चर्चा पोलीस दलात होत आहे.